फॉर्म फी रु. १००/-

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.
दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं / भांडार / वेबसाईट(संकेतस्थळ) देखभाल दुरुस्ती / २०२४-२०२५/ **३२२०** दिनांक:- १८/१०/२०२४

**दरपत्रक क्र. के. १३/ भांडार / कार्या.वेबसाईट (संकेतस्थळ) देखभाल दुरुस्ती /२०२४-२०२५**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळाच्या अखत्यारितील सांगली, सातारा व कोल्हापूर या जिल्हयाचे कामाचे कार्यक्षेत्र आहे. या विभागीय मंडळातून इ.१० वी व इ.१२ वीची परीक्षा घेऊन त्यांचे निकाल जाहीर करणे ही महत्वाची कामे पार पाडण्यात येतात. त्यासाठी या विभागीय मंडळाची **sscboardkolhapur.in**ही वेबसाईट (संकेतस्थळ) तयार करण्यात आलेली असून त्या वेबसाईटवर (संकेतस्थळ) खालील बाबी प्रसिध्द करणेत आलेली आहेत.

१) मंडळाचे नियम व अधिनियम
२) विभागीय मंडळाचे कामकाज कार्यपध्दती, प्रमुख उद्दिष्टे
३) विभागीय मंडळातून प्रसारित होणारी महत्वाची परिपत्रके
४) विद्यार्थ्यांना लागणारे विविध प्रकारचे फॉर्म चे नमुने

वरील प्रमाणे विभागीय मंडळाची कामकाजाची कार्यपध्दती वेबसाईटवर(संकेतस्थळ) प्रसिध्द करणेत आलेली आहे.त्यासाठी खालील अटी व शर्तीस अधिन राहून सोबत जोडलेल्या तपशिलानुसार ०१ वर्षाच्या कालावधीसाठी सीलबंद दरपत्रके **दिनांक २१/ १०/२०२४ ते दिनांक** २९/ १०/ **२०२४** या कालावधीत मागविण्यात येत आहेत. **दिनांक २९ / १० / २०२४ रोजी दुपारी ४.०० नंतर** प्राप्त होणारी दरपत्रके कोणत्याही परिस्थितीत स्विकारली जाणर नाही, याची नोंद घ्यावी.

दरपत्रकासाठी 'अ' व 'ब' लिफाफा पध्दत आहे.

### ' अ ' लखोटयात सादर करावयाची कागदपत्रे

१) मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ अन्वये अद्यावत व्यवसाय नोंदणी परवान्याची साक्षांकित प्रत. २.) पॅनकार्ड झेरॉक्स

### 'ब' लखोटयात सादर करावयाची कागदपत्रे

१ मंडळाचे अधिकृत दरपत्रक

कृ.मा.प.

## अटी व शर्ती

१ 'अ ' व ' ब ' सिलबंद लिफाफे एका मोठ्या पाकीटात समाविष्ठ करून सदर लखोटयावर दरपत्रक तपशील (क्रमांक, नांव व वर्ष) व दरपत्रकधारकाचे नांव व पत्ता लिहून सिलबंद करावे. अ लिफाफ्यामध्ये आवश्यक ती कागदपत्रे नसल्यास ब लिफाफा (दरपत्रक) उघडण्यात येणार नाही. या संदर्भात मंडळाच्या सक्षम समितीचा निर्णय अंतिम राहील.

२ दर नमूद करताना सर्व करांचा (उदा. GST) समावेश करुन दर नमूद करावेत. मान्य दरा व्यतिरिक्त इतर कोणतीही दरवाढ अथवा वेगळा आकार दिला जाणार नाही.

३ वेबसाईटमध्ये (संकेतस्थळ) कार्यालयाच्या मागणीप्रमाणे अद्यावतीकरण करणे आवश्यक आहे.

४ कार्यालयीन वेबसाईटमधील (संकेतस्थळ) माहिती अद्यावत (अपडेट) करणे आपणांवर बंधनकारक आहे.

५ मंडळाचे कामकाज हे परीक्षा प्राधान्य, महत्त्वाचे व तातडीचे असल्याने कार्यालयीन परिपत्रके, प्रकटने तातडीने अपलोड करणे आपणांवर बंधनकारक आहे.

६ वेबसाईट (संकेतस्थळ) देखभाल संदर्भातील आपले काम समाधानकारक नसल्याने अथवा अन्य कोणत्याही सबळ कारणाने मंजूर काम काढून घेण्याचे अधिकार विभागीय मंडळास राहतील. या संबंधी आपली कोणतीही तक्रार मान्य केली जाणार नाही.

७ कराराच्या कालावधीमध्ये उपरोक्त संदर्भात जर काही तंटा / वाद उद्‌भवल्यास वा निर्माण झाल्यास त्यासंबंधी कोल्हापूर कार्यक्षेतील कोर्टात निर्णय करण्याचा अधिकार राहील.

८ मान्य दरपत्रकधारकास रु.१००/- च्या स्टँप पेपरवर विहित नमुन्यात करारनामा सादर करणे बंधनकारक राहील.

९ कोणतेही दरपत्रक उघडणे अथवा नाकारणेचा अधिकार मंडळाचा राहील.

**( सुभाष रा. चौगुले )**
**विभागीय सचिव,**
**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च**
**माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर**
**विभागीय मंडळ, कोल्हापूर**

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.

दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com


**विभागीय मंडळाची वेबसाईट ( संकेतस्थळ ) देखभाल दुरुस्ती करणेसाठीचे दरपत्रक**
**(दरपत्रक क्र. के - १३/ भांडार / कार्या.वेबसाईट ( संकेतस्थळ ) देखभाल दुरुस्ती/ २०२४- २०२५)/३२२० दिनांक १८/१०/२०२४**

दरपत्रकधारकाचे नांव व संपूर्ण पत्ता :----------------------------------------------

----------------------------------------------

----------------------------------------------

----------------------------------------------

दूरध्वनी क्रमांक : मोबाईल क्रमांक :

| अ.क्र. | **कामाचा तपशील** | **दर रुपये (सर्व करांसहित )** |
|---|---|---|
| १. | कार्यालयीन वेबसाईटची (संकेतस्थळ) देखभाल व दुरुस्ती करणे, परिपत्रके अपलोड करणे, वेबसाईटवरील (संकेतस्थळ) माहिती अद्यावत करणे व इतर (डोमेन व होस्टींगसह) | |

कार्यालयीन वेबसाईटची (संकेतस्थळ) देखभाल दुरुस्ती करणे संदर्भातील दरपत्रक क्र.कोविमं / भांडार / वेबसाईट (संकेतस्थळ) देखभाल दुरुस्ती / २०२४-२०२५/ ३२२० दिनांक १८/ १०/२०२४ मधील सर्व अटी व शर्ती मला मान्य असून वर नमूद केलेल्या दराने काम करण्यास मी तयार आहे.

स्थळ :-

दिनांक :- **दरपत्रकधारकाची स्वाक्षरी व रबरी शिक्का.**